# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.05.2024** **वारःगुरुवार**

---

1.राज्यात पंतप्रधान आणि विरोधी पक्षनेत्यांच्या प्रचार सभांचे झंझावात

2.घाटकोपरमध्ये जाहिरात फलक दुर्घटनेतल्या पार्श्वभूमीवर फलकांवर कारवाईला आरंभ

3.महादेव बेटिंग ॲप प्रकरणी पुण्याजवळच्या नारायणगावमध्ये ७० जणांना अटक आणि

4.मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात जोराचे वारे, वीजा, गारपीट यांच्यासह हलका ते मध्यम पावसाचा इशारा

**<u>मोदी</u>**

काँग्रेसचा गरीबी हटावचा नारा म्हणजे अफूची गोळी आहे. मात्र, खऱ्या अर्थानं गरिबी दूर करण्याचं काम आपल्या सरकारनं केलं असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल कल्याण लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार श्रीकांत शिंदे आणि भिवंडीचे उमेदवार कपिल पाटील यांच्या संयुक्त प्रचारसभेत केलं. पुन्हा सत्तेत आल्यानंतर पहिल्या १०० दिवसात काय करायचं याचं नियोजन आपल्याकडे आहे. त्यासाठी देशाचं भवितव्य असलेल्या तरुणांनी सूचना कराव्या, २०४७ सालच्या संकल्प सिद्धीला यातूनच बळ मिळेल असंही मोदी म्हणाले.

आरंभी घाटकोपर इथ पंतप्रधानांनी पथफेरी काढली. अडीच किलोमीटर फेरी मार्गावर नागरिकांनी गर्दी केली होती. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई भाजपचे अध्यक्ष आमदार आशिष शेलार, उमेदवार मिहीर कोटेचा, उज्ज्वल निकम आदि सहभागी झाले होते

**<u>पंतप्रधान</u>**

दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील भाजपाच्या उमेदवार डॉक्टर भारती पवार आणि नाशिक लोकसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारासाठी निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत इथ काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा झाली. राज्यात नकली शिवसेनेचा

आता काँग्रेस पक्षात विलय होणेच बाकी आहे असं ते म्हणाले. भव्य श्री राम मंदिराची निर्मिती आणि काश्मीरमधील ३७० कलम काढून टाकण्याचं शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न पूर्ण झालं मात्र, नकली शिवसेनेनं मंदीर लोकार्पण सोहोळ्याचं निमंत्रण ठोकरलं तर काँग्रेस राम मंदिरांवरून मनमानी टीका करीत असल्याचं मोदी म्हणाले. यावेळी कांद्याच्या प्रश्नांबाबत बोलताना पंतप्रधान म्हणाले ---

**<u>पवार</u>**

देशाच्या प्रमुखाची जबाबदारी सर्व जाती धर्मांना एकत्र ठेवण्याची आहे. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विधानं ऐक्याला अडचणीत आणणारी ठरत असल्याची टीका राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी दिडोंरी लोकसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार भास्कर भगरे यांच्या प्रचारसभेत वणी इथं झाली. नार-पारसह पश्चिमी वाहिनी नद्यांचं गुजरातमध्ये वाहून जाणारं पाणी वळविण्याची योजना तातडीनं करण्याची आवश्यकता असल्याचं पवार म्हणाले.

नाशिकच्या कांदा निर्यातीला बंदी आणि गुजरातच्या कांद्याला सूट असे दुहेरी धोरण राबविताना महाराष्ट्रातले अनेक उद्योग गुजरातला नेले अशी टीका उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उध्दव ठाकरे यांनी नाशिक लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्या प्रचारार्थ काल जाहीरसभेत केली.

**<u>घाटकोपर</u>**

घाटकोपरमध्ये  जाहिरात फलक  कोसळून दुर्घटना झालेल्या ठिकाणी कोसळलेल्या फलकाचे सुटे भाग करण्यात  येत असून राडारोडा हटविण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. या दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यू  झाले  असून ७४ जखमींना सुखरूप बाहेर काढण्यात आलं. त्यापैकी ४२ जखमींवर महानगरपालिकेच्या विविध रूग्णालयांमध्ये उपचार सुरु असून ३२ जखमींना  उपचारानंतर घरी सोडण्यात आलं.

**<u>होर्डिंग्ज</u>**

घाटकोपर जाहिरात फलक दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर, नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे यांनी महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या फलकांची संख्या, त्यांचं आकारमान, त्यामधील परवानाप्राप्त फलकांची संख्या याची माहिती त्वरीत संकलित करण्याचे आदेश  दिले आहेत. तसच अवैध, अनधिकृत जाहिरात फलक काढून टाकण्याच्या सूचनाही आयुक्तांनी दिल्या आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिकेनेही अनधिकृत जाहिरात फलकांचं ऑडीट करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी महापालिका प्रशासनाने फलकांचे मालक आणि कंत्राटदार यांची बैठक घेतली. गेल्या महिन्यात महापालिकेच्या परवाना विभागानं 60 नवीन फलकांना परवानगी दिली असून सध्या शहरात 1196 अधिकृत फलक आहेत. निगडी ते दापोडी या महामार्गावर 35 मोठे फलक असून या मार्गावरून पुणे मुंबई वाहतूक मोठ्या प्रमाणावर होते तसंच हा पालखीचाही मार्ग असल्यानं इथल्या फलकांचं प्राधान्याने ऑडिट होणार आहे.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात 297 फलक असून त्याच संरचनात्मक परीक्षण करून अहवाल सादर करण्याचे आदेश आयुक्त तथा प्रशासक शुभम गुप्ता यांनी ठेकेदारांना दिले आहेत.सांगली महापालिका क्षेत्रात अनाधिकृत फलक काढून टाकण्याच्या कारवाईला  सुरुवात झाली आहे.

लातूर जिल्ह्यातील विनापरवानगी, अनधिकृत फलक, पताका तत्काळ काढून संबंधितांवर कठोर कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी  दिल्या आहेत.

**<u>महादेव बेटिंग ॲप</u>**

महादेव बेटिंग ॲप प्रकरणी  पुण्याजवळच्या नारायणगावमध्ये पुणे ग्रामीण पोलीसांच्या स्थानिक गुन्हे शाखेनं धाड टाकून ७० जणांना अटक केली. परदेशासह देशातील इतर राज्यात धाडी टाकल्यानंतर महादेव ऑनलाइन बेटिंग ॲपचे काम पुण्याजवळच्या नारायणगावामधून सुरू असल्याची माहिती मिळाली. छत्तीसगडमधील भिलाई इथल्या सौरभ चंद्राकर आणि रवी उप्पल यांनी महादेव बेटिंग ॲप सुरु केल. दुबईत बसून ते या ॲपचं काम करत होते. या ॲपसाठी त्यांनी मलेशिया, थायलंड, भारत आणि UAE मध्ये कॉल सेंटर्स उघडली होती. त्या माध्यमातून ऑनलाइन सट्टेबाजीद्वारे त्यांनी हवालामार्फत कोट्यवधी रुपयांची आर्थिक अफरातफर केल्याचं सक्तवसुली संचालयानलयानं केलेल्या तपासात उघड झालं आहे.

**<u>मदत</u>**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाद्वारे गेल्या १ वर्ष १० महिन्यात ३० हजारपेक्षा अधिक गरजू रुग्णांना  २५५ कोटी ५४ लाख  रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुंबईतल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष कार्यालयातून  २३३ कोटी तर नागपूर कार्यालयामधून २२ कोटी रुपयांचं अर्थसहाय्य वाटप करण्यात आलं आहे.

**<u>अटक</u>**

नागपूरमधील समता सहकारी बँकेतील १४५ कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातगेली  १७ वर्षे  फरारी असलेल्या आरोपीला राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकान हैद्राबादमधून अटक केली आहे . विजयकुमार रामचंद्र दायमा अस त्याच नाव असून , हा  आरोपी गेली १७ वर्ष पुणे, मुंबई, तेलंगणा परिसरात ओळख लपवून वास्तव्य करत असल्याच तपासात उघडकीस आल आहे. समता सहकारी बँकेतील अधिकारी, कर्मचारी, संचालक मंडळान बनावट कर्जप्रकरणे सादर करून १४५ कोटी ६० लाख रुपयांचा गैरव्यवहार केला होता.

**<u>रोख-</u>**

कल्याण लोकसभा मतदारसंघातील कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघात स्थिर सर्वेक्षण पथकानं सात लाख रुपयांची संशयास्पद रोख रक्कम जप्त केली आहे. कल्याण रेल्वे स्थानकात एका नागरीकाकडून ही रक्कम जप्त करण्यात आली.

**<u>दामले-</u>**

अठ्ठावीस मेपर्यंत योग्य पाऊल उचललं नाही, तर दामोदर हॉलसाठी उपोषणाला बसणार असल्याचा इशारा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी काल पत्रकार परिषदेत दिला. मराठी रंगभूमीची मातृसंस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेकडं परळच्या दामोदर हॉल आणि सहकारी मनोरंजन मंडळाच्या वादात आता अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेनं हस्तक्षेप केला आहे.

**<u>पुस्तक</u>**

अमेरिकेतील नागरी अधिकारांची चळवळ या प्राध्यापक दीपक गायकवाड यांनी लिहिलेल्या आणि अवधूत डोंगरे यांनी मराठीत अनुवादित केलेल्या पुस्तकाचं प्रकाशन काल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात करण्यात आलं. आजही पाश्चात्य जगात वर्णभेदाची समस्या का आहे हे समजून घेण्यासाठी हे पुस्तक म्हणजे उत्तम संदर्भसाधन असल्याचं मत कुलगुरु डॉक्टर सुरेश गोसावी यांनी यावेळी व्यक्त केलं.

**लैंगिक**

राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रमांतर्गत वाशिम जिल्हा रुग्णालयामार्फत चार मैत्री क्लिनिक स्थापन करण्यात आले आहेत. यामध्ये १० ते १९ वयोगटातील मुलामुलींना लैंगिक आरोग्याबद्दल समुपदेशन आणि मार्गदर्शन केलं जातं. जिल्ह्यातील जास्तीत जास्त किशोरवयीन मुलामुलींनी मैत्री क्लिनिकला अवश्य भेट द्यावी असं आवाहन जिल्हा शल्यचिकीत्सक डॉक्टर अनिल कावरखे यांनी केलं आहे.

**निधन**

पुण्याच्या माजी महापौर रजनी त्रिभुवन यांचं काल पुण्यात हृदविकाराच्या झटक्यानं निधन झालं. त्या ६१ वर्षांच्या होत्या. त्रिभुवन या 2004 ते 2006 दरम्यान पुणे महापालिकेच्या महापौर होत्या. महापौरपदाच्या कार्यकाळात त्यांनी अनेक लोकोपयोगी आणि धाडसी निर्णय घेतले.

**आपत्ती सामना**

कोल्हापूर जिल्ह्यातील मागील पूरस्थितीचा अनुभव लक्षात घेता नदीकाठावरील ३९१ पूरबाधित गावांमध्ये आवश्यक उपाययोजना राबवून पावसाळ्यापूर्वी, दरम्यान आणि नंतरचं नियोजन करण्याचा निर्णय जिल्हास्तरीय विभाग प्रमुखांच्या बैठकीत घेण्यात आला.

**आढावा**

सांगली जिल्ह्यातील भौगोलिक स्थिती लक्षात घेता, पूरस्थितीमध्ये संबंधित यंत्रणांनी आपापसात समन्वय ठेवून योग्य नियोजन करावं, नागरिकांना पूरस्थितीचा सामना करावा लागता कामा नये, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉक्टर राजा दयानिधी यांनी काल आढावा बैठकीत दिल्या.

**पाऊस**

गडचिरोली शहरासह जिल्ह्याच्या काही भागात  काल संध्याकाळी पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. त्यामुळे गडचिरोलीत काही काळ वीजपुरवठा खंडित झाला होता.

**हवामान**

उत्तर कोकणात आज उष्णतेची लाट राहील. मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात आणि विदर्भात जोराचे वारे, वीजा, गारपीट यांच्यासह हलका ते मध्यम पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. हा इशारा उद्यापर्यंत राहील.

आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपल. नमस्कार